रासनिप्रा

# विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था पुणे विभाग, पुणे
# साखर संकुल शिवाजीनगर पुणे-४११००५

दुरध्वनी क्र-०२०-२९५२२४१८ इमेल-djr_pna@rediffmail.com

जा.क्र.विसनिपुणे/निवडणूक/पुणे जिमस बँक/ठराव/ १२२३ /२०२६/ दिनांक: - २१/०८/२०२६

प्रति,

अध्यक्ष / सचिव / व्यवस्थापक,

__________________________

__________________________

**विषय : पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., पुणे संचालक मंडळ निवडणूक सन २०२६-२७ ते २०३१-३२ सदस्य संस्थांच्या प्रतिनिधीचे ठरावाबाबत...**

**संदर्भ :** १. प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., पुणे यांचेकडील जा.क्र./संचालक मंडळ/८८ दि.२९/०६/२०२६ रोजीचे पत्र.

२. मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाकडील जा.क्र.रासनिप्रा / कक्ष-११/ पुणे जि.म.स.बँक/ निवडणूक/२६५५/२०२६ दि.१६/०७/२०२६ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे

२/- पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., पुणे बँकेच्या संचालक मंडळ निवडणूकीसाठी दिनांक २४/०८/२०२६ ते दिनांक २२/०९/२०२६ या कालावधीत महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील नियम १० (२) अन्वये आपल्या संस्थेच्या प्रतिनिधीचा ठराव सादर करावयाचा आहे. सदर निवडणूकीकरीता दि.०३/०१/२०२७ ही अर्हता दिनांक म्हणून घोषित केली आहे. त्यामुळे ज्या संस्था दिनांक ०३.०१.२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी (अर्हता दिनांकाच्या तीन वर्षापूर्वी) सभासद झाल्या आहेत अशाच सभासद सहकारी संस्था मतदानासाठी वा ठराव पाठविण्यासाठी पात्र असतील. सदर प्रतिनिधीच्या ठरावासाठी उपविधीतील तरतुदीचे पालन करुन संस्थेच्या संचालक मंडळाची / सर्वसाधारण सभा बोलविण्यात यावी. सदर सभेची नोटीस संस्थेच्या सर्व संचालकांना पोहोच करण्याची जबाबदारी संस्थेच्या सचिवांची / व्यवस्थापकाची असेल. सभेत उपस्थित संचालकांची हजेरीपटावर स्वाक्षरी घेऊन अनुपस्थित संचालकांची तशी नोंद हजेरीपटावर घ्यावी. सदर सभेत प्रतिनिधीचा ठराव पारीत करुन सदर ठरावाची साक्षांकीत सत्यप्रत संबंधीत उप / तालुका सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयात दिनांक २२/०९/२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत सादर करावी. सभासद सहकारी संस्थेच्या प्रतिनिधीचा ठराव पारीत करणेपूर्वी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २७ (१०) व त्याचेशी संलग्न कलम ७३ कअ (१) (i) (एफ) (i), (ii) व (iii) ची तरतूद विचारात घेऊन पारीत करावा. सदर तरतुदीनुसार प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था वगळता इतर सभासद संस्था जिल्हा बँकेच्या कलम २७ (१०) नुसार थकीत असल्यास सदर संस्था मतदानास पात्र असणार नाहीत. त्याचप्रमाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सदस्य असलेल्या प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्था थकबाकीत असतील, अशा संस्थेच्या संचालकाऐवजी संस्थेच्या थकबाकीदार नसलेल्या एखादया सभासदाचा प्रतिनिधी म्हणून समावेश करणारा ठराव संस्था घेऊ शकते आणि सदरच्या संलग्न सभासद संस्था थकबाकीत नसतील तर संचालक मंडळ सदस्याचा / संस्था सभासदांचा प्रतिनिधी म्हणून ठराव करता येऊ शकतो. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सीए (१) (फ) (iii) मधील तरतुदीनुसार ज्या संस्थेची व्यवस्थापन समिती निष्प्रभावित झालेली असेल अशा संस्थेचे प्रतिनिधित्व करेल अशी व्यक्ती संघीय संस्थेच्या निवडणुकीकरिता संचालक म्हणून अपात्रता धारण करीत असल्याची तरतूद आहे. सहकार अधिनियमाचे कलम ७७ (अ) व कलम ७८ अन्वये नियुक्त केलेल्या प्रशासकास अधिनियमातील तरतुदींना अधिन राहून "प्रतिनिधीची निवड करणे" या

विषयासाठी सर्वसाधारण सभा बोलाविण्याचा अधिकार आहे आणि असा प्रतिनिधी जर इतर अनुषंगिक नियमांन्वये पात्र असेल तर सदर बँकेच्या मतदानास पात्र असेल. दिनांक २४/०८/२०२६ पूर्वीच्या संचालक मंडळ / सर्वसाधारण सभेचा ठराव ग्राहय धरण्यात येणार नाही.

एका संस्थेने एकच ठराव बहुमताने पारीत करणे आवश्यक आहे. एका संस्थेमध्ये एकापेक्षा जास्त ठराव पारीत करण्याची प्रवृत्ती आढळून आल्यास किंवा इतर अनियमितता आढळून आल्यास संस्थेचे सचिव / व्यवस्थापक / पदाधिकारी हे कलम १४६ अन्वये फौजदारी दाखल करण्यास पात्र ठरतील याची नोंद घ्यावी. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ च्या नियम १० मधील पोटनियम ४ मधील तरतूदीनुसार सभासद संस्थेने एकदा पाठविलेला प्रतिनिधीचा ठराव जर संस्थेचे संचालक मंडळ निवडणुकीव्दारे बदलले असेल किंवा प्रतिनिधीचा मृत्यु झाला असेल किंवा प्रतिनिधीने राजीनामा दिला असेल किंवा अधिनियमाच्या, नियमाच्या, उपविधीच्या कोणत्याही तरतुदी अन्वये सक्षम प्राधिकरणाच्या अभिनिर्णयावरुन असा प्रतिनीधी अपात्र असल्याचे आढळून आले असेल तर या चार कारणांसाठी नव्याने ठराव घेऊन प्रतिनिधी नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या निश्चित केलेल्या अंतिम दिनांकाच्या पाच दिवस पूर्वी पर्यंत बदलता येऊ शकेल, अन्यथा बदल करता येणार नाही.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेशी संलग्न सभासद सहकारी संस्थेच्या प्रतिनिधीचा उपविधीतील तरतुदीनुसार ठराव संबंधीत तालुक्याचे उप / सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे सादर करताना सदर ठरावाच्या साक्षांकीत सत्यप्रतीसह संचालक मंडळ / सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त, सभेच्या नोटीसीची प्रत व उपस्थित संचालकांचे हजेरीपटाची प्रत सादर करावी व ठराव सादर करतेवेळी या बाबतचे सभासद संस्थेचे मूळ रेकॉर्ड संबंधीत सहाय्यक निबंधक यांना तपासणीकामी उपलब्ध करुन दयावे. नियम १० (३) अन्वये बँकेच्या संलग्न सभासद संस्थेच्या प्रतिनिधी पाठविणेबाबत करावयाच्या ठरावाचा नमुना या सोबत जोडला आहे. सदर ठराव **०४ प्रतीत** संबंधित तालुक्याचे उप / सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयास सादर करावा. दिनांक २२/०९/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेनंतर आलेले ठराव स्वीकारले जाणार नाहीत अथवा ग्राह्य धरले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**सोबत : सहपत्रे**

Digitally signed by
Digvijay Dilip Aher
Date: 21-08-2026
14:15:15

(दिग्विजय आहेर)
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे